07 FEB 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्येष्ठांच्या आनंदी जीवनासाठी प्रयत्नशील : डॉ. पाटील

## कौशल्य, उद्योजकता विकास केंद्रातर्फे कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ६ : विद्यापीठ परिक्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांच्या आनंदी जीवनासाठी विद्यापीठ सातत्याने प्रयत्नशील राहील. कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व आजीवन शिक्षण व विस्तार विभागाने घेतलेली ही कार्यशाळा हा स्तुत्य उपक्रम आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. पी. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उदयोजकता विकास केंद्र व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांचे संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरीकांसाठी खेळातून आनंदायी जीवन या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. यावेळी ते बोलत होते.




या वेळी डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. प्र-कुलगुरु पुढे म्हणाले की, जेष्ठ नागरीकांचे वय लक्षात घेता त्यांच्या शारीरिक सदृढतेबरोबर मानसिक सदृढता ही अधिक महत्वाची आहे. या वयात त्यांना ऐकाकीपणा वाटू नये यासाठी त्यांना वेगवेगळ्या कार्यशाळामधून मार्गदर्शन करण्याची भूमिका विद्यापीठ घेत असून असे उपक्रम आयोजित केले जातील. प्रत्येकाने आयुष्यात एक ठराविक वय झाल्यावर ही न थांबता ज्ञानावर्ती काम करत राहीले पाहीज. आपले ज्ञान शेवटपर्यंत वाढवत ठेवून आहे ते ज्ञान इतरांपर्यंत पोहचविण्याचे कार्य वेगवेगळ्या कृतीमधून आपण सातत्याने केले पाहीजे. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रामध्ये डॉ. कृष्णा पाटील यांनी खेळातून परस्पर सहसंबंध या विषयावर कृतीयुक्त मार्गदर्शन केले. यामध्ये प्र-कुलगुरू सहभागी झाले होते. दुस-या सत्रामध्ये प्रा. ए. एम. गुरव यांनी खेळातून आनंदी जीवन या विशयावर विविध प्रकारचे खेळ घेवून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. या वेळी कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र व आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्राध्यापक, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# महाविद्यालये सुरू करण्याबाबतचा अहवाल विद्या परिषदेस सादर होणार

## महाविद्यालये सुरू करणे समितीची बैठक; १५ फेब्रुवारीपासून प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर शनिवारी महाविद्यालये सुरू करणे समितीची बैठक झाली. बैठकीत महाविद्यालये सुरू करण्याबाबतचा अहवाल तयार करण्यात आला आहे. हा अहवाल ९ फेब्रुवारीला होणाऱ्या विद्या परिषदेच्या बैठकीत मंजुरीसाठी ठेवला जाणार आहे.

राज्य सरकारने महाविद्यालये १५ फेब्रुवारीपासून ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत रोटेशननुसार सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे २७६ महाविद्यालये, विद्यापीठात ४० अधिविभाग आहेत.



शिवाजी विद्यापीठातून...

अडीच लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महाविद्यालये सुरू करण्याची तयारी सुरू झाली आहे. त्याअनुषंगाने प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखालील समितीची बैठक झाली. बैठकीत मागील अहवालावर तसेच राज्य सरकारच्या आदेशाच्या अधिन राहून महाविद्यालये सुरू करण्याबाबत चर्चा झाली.

महाविद्यालयांमधील प्रात्यक्षिके, ऑनलाईन-ऑफलाईन वर्ग, वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांचे राहण्याचे नियोजन, याबाबत चर्चा झाली. वसतिगृहांची स्वच्छता, सॅनिटायझेशन, विद्यार्थ्यांची सुरक्षा, इतर जिल्हे व परराज्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे नियोजन, इलेक्ट्रिक, फायर ऑडिटच्या कार्यवाहीबाबत नियोजन करण्यात आले. समितीचा अहवाल ९ तारखेच्या विद्या परिषद व १० तारखेच्या व्यवस्थापन परिषद बैठकीत मंजुरीसाठी ठेवला जाणार आहे. त्यानंतर महाविद्यालये सुरू केली जाणार आहेत. बैठकीस उपकुलसचिव एम. पी. कदम, डॉ. पी. व्ही. कडोले, डॉ. एच. एन. मोरे, प्रा. डॉ. अक्षय सरवदे यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

# महाविद्यालये सुरू प्रश्नी अहवाल तयार

## शिवाजी विद्यापीठात बैठक : अहवाल विद्यापरिषदेकडे सादर होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विद्यापीठातील अधिविभाग, महाविद्यालये १५ फेब्रुवारीपासून सुरू केली, तर ती कशा पद्धतीने भरवायची, अभ्यासक्रम व परीक्षांचे वेळापत्रक काय स्वरूपाचे असेल याबाबतचा सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे. तो मंगळवारी (दि. ९) विद्यापरिषदेकडे मंजुरीसाठी पाठवला जाणार आहे. परिषदेच्या मंजुरीनंतर तो बुधवारी (दि. १०) रोजी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत अंतिम मंजुरीसाठी ठेवला जाणार आहे. त्यानंतर शासन आदेशाच्या अधीन राहून महाविद्यालये सरू केली जाणार आहेत.

राज्य सरकारने महाविद्यालये १५ फेब्रुवारीपासून ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत रोटेशननुसार सुरू करण्याचे आदेश काढले आहेत. त्यानुसार शनिवारी दुपारी शिवाजी विद्यापीठात महाविद्यालय प्रतिनिधींसमवेत प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे २७६ महाविद्यालये, विद्यापीठात ४० अधिविभाग आहेत. अडीच लाखांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. लॉकडाऊनपासून गेले १० महिने महाविद्यालये बंदच आहेत. आता कोरोनाचा कहर कमी झाल्याने महाविद्यालये सुरू करण्याची तयारी सुरू झाली आहे. शिक्षण मंत्र्यांच्या तशा सूचना आल्यानंतर तशी तयारीही सुरू झाली आहे.

महाविद्यालये सुरू करण्याबाबत समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीने शनिवारी विस्तृत आढावा घेतला. महाविद्यालयांमधील प्रात्यक्षिके, ऑनलाइन-ऑफलाइन वर्ग, वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांचे राहण्याचे नियोजन याबाबत चर्चा झाली. वसतिगृहांची स्वच्छता, सॅनिटायझेशन, विद्यार्थ्यांची सुरक्षा, इतर जिल्हे व परराज्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांचे नियोजन, इलेक्ट्रिक, फायर ऑडिटच्या कार्यवाहीचा आढावा घेतला गेला.

# व्यवस्थापन परिषद घेणार निर्णय

## महाविद्यालये सुरू करण्यासाठी समितीकडून वस्तुस्थितीची पाहणी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालये आणि अधिविभाग सुरू करण्याबाबतचा अहवाल तयार झाला आहे. हा अहवाल मंगळवारी (ता. ९) होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवला जाईल. अहवालाला मंजुरी मिळाल्यानंतर त्यातील मार्गदर्शक सूचनांच्यानुसार १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू होतील. आज या संदर्भात विद्यापीठात बैठक झाली.



लॉकडाउमुळे महाविद्यालये २३ मार्च पासून बंद झाली. गेल्या आठवड्यात उच्च व तंत्र शिक्षण विभागाने १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन निर्णयाची अंमलबजावणी करायची असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने

**दृष्टिक्षेपात**

महाविद्यालये............२७६
अधिविभाग.............. ४०
विद्यार्थी ..............अडीच लाखांहून अधिक

महाविद्यालय सुरू करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना या अहवालात असणार आहेत. याबाबतची बैठक आज झाली. अहवाल मंगळवारी (ता. ९) होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मांडला जाणार आहे. राज्य सरकारने महाविद्यालये १५ फेब्रुवारीपासून ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत रोटेशननुसार महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. बैठकीस उपकुलसचिव एम.पी.कदम, डॉ.पी.व्ही.कडोले, डॉ.एच.एन.मोरे, प्रा. डॉ. अक्षय सरवदे यांच्यासह समिती सदस्य उपस्थित होते.

# आंतरराष्ट्रीय भेट कार्यक्रमाचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटच्या वतीने आयोजित इंटरनॅशनल एक्सपोझर व्हिजिट प्रोग्रामचा समारोप भावुकतेत झाला.

विद्यापीठात २ ते ५ फेब्रवारी दरम्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात प्रामुख्याने सहकार क्षेत्रातील यशस्वी उद्योग प्रारूपांना भेटी देण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय भेटी कार्यक्रमाचा समारोप प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील यांच्या उपस्थितीत झाला. याप्रसंगी सहभागी अभ्यासकांनी भेटीदरम्यानची निरीक्षणे सादर केली. कोल्हापूर जिल्हा देशासाठीच नव्हे, तर जगासाठी सहकार क्षेत्रातील एक आदर्श प्रारूप असल्याची बाब त्यांच्या निरीक्षणातून अधोरेखित केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. नीलम खामकर, चेतन गळगे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. डी. रवी यांनी केले. डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले.

# दुर्मिळ, औषधी वनस्पती आणल्या जगासमोर

**» आम्ही कोल्हापुरी**

## डॉ. शिंपले यांचा अंदमान निकोबार बेटावरील जैवविविधतेचा अभ्यास

**नंदिनी नरेवाडी-पाटोळे :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : भारतात आढळणाऱ्या दुर्मिळ आणि औषधी गुणधर्म असलेल्या पाच वनस्पती जगासमोर आणल्या आहेत, कोल्हापुरातील डॉ. विनोद भीमराव शिंपले यांनी. अंदमान निकोबार बेटावरील जैवविविधतेचा अभ्यास केला असून ग्रेट निकोबार बेटावरील मुसांडा निकोबारिका या वनस्पतीचा त्यांनी शोध लावला आहे. तेथील ज्या वनस्पती



**डॉ. शिंपले**

भारतीय म्हणून नोंद नव्हत्या, अशा सहा वनस्पतींचीही दखल घेतली आहे. त्यांच्या या संशोधनामुळे अंदमान निकोबार बेटावरील दुर्मिळ व औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पतींची ओळख जगासमोर आली आहे.

डॉ. शिंपले आर.के.नगर परिसरात राहतात. त्यांचे पदव्युत्तर शिक्षण शिवाजी विद्यापीठात वनस्पतीशास्त्र विषयातून झाले. शिवाजी विद्यापीठातच त्यांनी पीएच. डी. संपादन केली. त्यानंतर दिल्ली विद्यापीठातील सेंटर फॉर एनव्हारमेंट ॲण्ड डिग्रेडेट इकोसिस्टिममध्ये संशोधन सुरू केले. या संशोधनांतर्गत सात महिने त्यांनी अंदमान निकोबार बेटावरील जैवविविधतेचा अभ्यास केला. येथील मुसांडा निकोबारिका या वनस्पतीला गुलाबी रंगाची फुले येतात. ही वनस्पती फक्त ग्रेट निकोबारिका बेटावरच आढळते.

दरम्यान, त्यांच्या या संशोधनाबाबत माहिती देण्यासाठी त्यांना चायना, रशिया व सिंगापूर येथील आंतरराष्ट्रीय परिषदांत व्याख्याते म्हणून आमंत्रित केले होते. त्यांनी एलफिस्टन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. सध्या ते न्यू कॉलेजमध्ये वनस्पतीशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. सह्याद्री पर्वतरांगामधील जैवविविधतेबाबत त्यांचा अभ्यास सुरू आहे. येथे आढळणाऱ्या गारवेल या वनस्पतीच्या कुळातील वनस्पतींबाबत ते संशोधन करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पाच विद्यार्थी पीएच.डी.चे शिक्षण घेत आहेत. त्यांच्या या संशोधनाबद्दल त्यांना कालिकत विद्यापीठाची फेलोशिप मिळाली आहे.

**या वनस्पती प्रजातींचा लावला शोध**

- एरिओ कोलान बेलगामेसिल
- मुसांडा निकोबारिका
- इरिओकोलॉन बारामतीकम
- बोनय्या मिलींदी
- आयपोमेया सातारेन्सिस